अति. महा. आयुक्त (ज) कार्यालय,
पुणे महानगरपालिका
जा.क्र : अतिमआ(ज)/ साप्रवि/२९४३
दिनांक : २४।०६।२०२२

- कार्यालय परिपत्रक –

विषय :- उप अभियंता (वाहतूक नियोजन) या पदावर तात्पुरती पदोन्नती देणेकामी प्रारूप सेवाजेष्ठता यादीबाबत

संदर्भ :-
१) मे. शासन निर्णय पीएमसी.३०१४/प्र.क्र.०२/नवि-२२, दि.२६/८/२०१४.
२) मे. शासन निर्णय क्रमांक पीएमसी-३०१९/प्र.क्र.१०८/नवि-२२, दि.०३/०८/२०२०
३) मा. महापालिका आयुक्त ठ.क्र. १/२६१, दि.१८/०२/२०२२
४) कार्यालय परिपत्रक जा. क्र. अतिमआ(ज)/साप्रवि/१०६०२,दि.२३/०३/२०२२
५) मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) ठ.क्र.१/२१८ , दि.२४।०६/२०२२

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील अभियांत्रिकी संवर्गातील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)/कनिष्ठ अभियंता (वाहतूक नियोजन) वर्ग - ३ या पदावरून उप अभियंता (वाहतुक नियोजन) वर्ग २ या पदावर तदर्थ पदोन्नतीने नेमणूक करणेकामी संदर्भ क्र. ४ अन्वये कार्यालय परिपत्रक प्रसृत करुन अर्ज मागविण्यात आले होते. सदर अर्ज प्राथमिक स्वरूपात तपासणी करण्यात आले असून पात्र / अपात्र सेवकांची सेवाजेष्ठता यादी प्रारुप स्वरुपात प्रसिध्द करण्यात येत आहे.

कार्यालयीन परिपत्रक दि. २३/०३/२०२२ अन्वये ज्या सेवकांचे अर्ज प्राप्त झालेले आहेत, अशा सेवकांच्या नावाचा समावेश सदर सेवाजेष्ठता यादीमध्ये करण्यात आला आहे. सदर यादीतील सेवक/कर्मचारी यांनी स्वतःचे नांव, जात, जातीचा गट, शैक्षणिक पात्रता, जन्मदिनांक, नेमणूकीचे दिनांक इ. सर्व बाबींची पाहणी करुन आपल्या नावांसमोर स्वाक्षरी करावी.

सदर यादीमध्ये घेण्यात आलेल्या नोंदीबाबत काही आक्षेप/चुका असल्यास हे कार्यालय परिपत्रक प्रसिध्द झाल्याचे दिनांकापासून ०७ दिवसाचे मुदतीत (दिनांक ०५।०७।२०२२ ) आपले आक्षेप लेखी स्वरुपात, कागदपत्रांच्या पुराव्यासहीत आस्थापना विभाग, रुम नं. २४०, पुणे महानगरपालिका, मुख्य इमारत येथे कार्यालयीन वेळेत सादर करावे. तसेच मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांची दखल घेतली जाणार नाही.

संबंधित सेवक/कर्मचारी यांचे शैक्षणिक अर्हतेच्या कागदपत्राबाबत तक्रार आल्यास व त्यामध्ये तथ्य आढळल्यास संबंधित सेवक/कर्मचारी यांची नेमणूक कोणत्याही टप्प्यावर संपुष्टात आणणेबाबत अलहीदा निर्णय घेण्यात येईल.

संबंधित मा. खातेप्रमुख यांनी या कार्यालय परिपत्रकाची समज त्यांचे नियंत्रणाखालील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)/ कनिष्ठ अभियंता (वाहतूक नियोजन) या पदावरील पदोन्नती देणे कामी शिफारस केलेल्या कर्मचारी/सेवक यांना देणेत यावी व संबंधितांना त्याप्रमाणे अवगत करण्याची दक्षता घ्यावी. सदरची यादी पुणे महानगरपालिकेच्या https://pmc.gov.in/en/circulars या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

विहीत मुदतीत विषयांकित पदावरील कर्मचारी/सेवक सेवाजेष्ठता यादी पाहण्यासाठी समक्ष गैरहजर राहिल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित खातेप्रमुखांवर राहिल याची नोंद घ्यावी.

तरी, संबंधित खातेप्रमुख यांनी वरीलबाबत जरुर ती पुढील तजवीज करावी.

Rawt

(रविंद्र बिनवडे)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका
23/6/2022

प्रत- सर्व संबंधित अधिकारी,
खातेप्रमुख/विभागप्रमुख,
पुणे महानगरपालिका

यांजकडे माहितीसाठी रवाना ......

## उप अभियंता (वाहतूक नियोजन) या पदासाठी प्राप्त झालेल्या अर्जांची प्रारूप सेवाजेष्ठता यादी

| अ. क्र. | सेवकाचे नाव व हुद्दा | जातीचा प्रवर्ग | जात वैधता प्रमाणपत्र क्र. | जन्म दिनांक | नेमणूक दिनांक | शैक्षणिक अर्हता | विद्यापिठाचे/ महाविद्यालयाचे नाव | मार्कशीट/ सर्टिफिकेट नंबर व दिनांक | स्वाक्षरी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.मापारी पवन पुरुषोत्तम कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | इमाव | ४४३६, दि.२५.११.०८ | १४.११.१९९० | ०५.०१.२०१७ | १. बी.ई.(सि)<br>२. एम.टेक (ट्रान्सपोर्ट इंजिनिअरींग) | १. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा युनिव्हर्सिटी, औरंगाबाद<br>२. विश्वेश्वरय्या राष्ट्रीय प्रौद्योगिकी संस्थान, नागपूर | १) ए ७५४७१, दि. ५.६.२०१३<br>२)MT12TRE011 दि.१५.९.२०१४ | | |
| २ | श्री. गजभिये आदेश रोशन, कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | अजा | ७०९४०, २५/२/२००९ | ३१.०५.१९९२ | ०५.०१.२०१७ | १. बी.ई.(सि) | १. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ | १) २६५२३१९, दि.०८.०७.२०१३ | | |
| ३ | श्रीमती पाटील स्नेहल अभिजीत, कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | इमाव | ०४३४८, ०२/०६/२००९ | १५.०४.१९९१ | २०.०५.२०१७ | १. बी.ई.(सि)<br>२. एम.टेक (सि) (स्ट्रक्चरल इंजिनियरिंग ) | १. नॉर्थ महाराष्ट्र विद्यापीठ जळगांव<br>२. पुणे विद्यापीठ, पुणे | १) २२००३१११, दि.मे २०१३<br>२) इएन१७-००७०१, दि.२०.०१.२०१८ | | |

20/6/22

उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका